Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)
VOL- XII ISSUE- V MAY 2025 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 8.379 ISSN 2349-638x

# राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या कुस्ती क्षेत्रातील योगदानाचा ऐतिहासिक आढावा

**रोहिणी बाळकृष्ण औताडे**
शोध विद्यार्थिनी,
इतिहास अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

**घोषवारा :**

*भारतीय उपखंडातील मल्लविद्या ही केवळ शरीरबलाची क्रीडा नसून, ती अनेक शतकांची समृद्ध सांस्कृतिक परंपरा आणि जीवनशैली आहे. भारताच्या विविध भागांत या कलेला वेगवेगळ्या नावांनी ओळखले जाते, पण तिच्या मुळाशी शारीरिक ताकद, नैतिकता, शिस्त आणि समाजाभिमुखता यांचा संगम आहे. पश्चिम महाराष्ट्रात म्हणजेच कोल्हापूर, सातारा, सांगली, पुणे, सोलापूर या जिल्ह्यांचा समावेश असलेल्या प्रदेशात—मल्लविद्येला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. या कलेचे ऐतिहासिक आणि सामाजिक मोल इतके खोलवर रुजले आहे की, ती केवळ एक खेळ न राहता समाजजीवनाचा अविभाज्य भाग बनली आहे.*

*शाहू महाराज हे मल्लविद्येचे महान संरक्षक आणि प्रचारक होते, हे निर्विवाद आहे. पण त्यांच्या अगोदरही पश्चिम महाराष्ट्रात कुस्तीची भक्कम परंपरा होती. मराठा साम्राज्य आणि पेशवाई काळात मल्लांना राजाश्रय मिळाला होता. राजदरबारातील मल्लांचे स्थान मोठे होते; दरबारात कुस्ती स्पर्धा नियमितपणे होत. काही वेळा राजांचे अंगरक्षक म्हणूनही मल्लांची निवड होत असे. प्रस्तुत शोधनिबंधातून राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या कुस्ती क्षेत्रातील योगदानाचा चिकित्सक अभ्यास केला जाणार आहे.*

*कळीचे मुद्दे: मल्लविद्या, सामाजिक मोल, पश्चिम महाराष्ट्रात, पेशवाई, राजाश्रय, अंगरक्षक*

**प्रस्तावना:**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळातही मल्लविद्येला उत्तेजन मिळाले. छ. शिवाजी महाराज स्वतः शारीरिक तंदुरुस्तीवर भर देणारे होते. त्यांनी सैनिकांसाठी आखाडे, प्रशिक्षण केंद्रे सुरू केली. त्या काळात मल्ल हे केवळ खेळाडू नव्हते, तर शस्त्रविद्येत निपुण आणि नीतिमान योद्धे होते.

शाहू महाराज पूर्वी कोल्हापूर, सांगली, सातारा परिसरातील अनेक आखाडे धार्मिक स्थळांच्या परिसरात चालवले जात. मल्ल हनुमानाचे उपासक असत, आहारात सात्त्विकता पाळली जात असे, आणि नियमबद्ध दिनचर्या हा आखाड्यांचा विशेष भाग होता. सकाळी व्यायाम, कुस्ती, संध्याकाळी हनुमान पूजन, असा त्यांचा कठोर आणि शिस्तबद्ध दिनक्रम असे.

त्याकाळी मल्ल हा समाजाचा सन्माननीय घटक मानला जाई. त्याच्या अंगी असलेले नैतिक बळ, संयम, अहिंसा आणि समाजसेवा यामुळे त्याला आदर मिळत असे. गावातील वाद मिटवण्यासाठीही मल्लांचा सल्ला घेतला जाई. त्यामुळे मल्ल हा केवळ खेळाडू न राहता, संस्कृतीचा वाहक आणि समाजाचा आधारस्तंभ बनला होता. ही परंपरा आजही पश्चिम महाराष्ट्रात जिवंत आहे. मल्लविद्या म्हणजे केवळ कुस्ती नव्हे, तर ती समाजाच्या मनामनात रुजलेली एक प्रेरणादायी जीवनपद्धती आहे.

**छत्रपती राजर्षी शाहू महाराजपूर्व काळातील मल्लविद्या:**

**१. छ. शिवाजी महाराजांच्या काळातील मल्लविद्येस मिळालेले प्रोत्साहन:**

पश्चिम महाराष्ट्रातील मल्लविद्येची मुळे मराठा साम्राज्याच्या उदयापूर्वीही खोलवर रुजलेली होती. १७ व्या शतकात छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात या कलेला सैन्यातील शारीरिक प्रशिक्षणाचा भाग म्हणून महत्त्व होते. शिवाजी महाराजांनी आपल्या सैनिकांसाठी आखाडे आणि प्रशिक्षण केंद्रे स्थापली, जिथे मल्लविद्या, तलवारबाजी, आणि धनुर्विद्या शिकवली जात असे. या काळात मल्ल हे योद्धे-खेळाडू म्हणून ओळखले जात. त्यांना केवळ शारीरिक ताकदीवरच नव्हे, तर नीती, शिस्त, आणि सामरिक कौशल्यावरही गर्व होता.

**२. पेशवे व संस्थान काळातील माल्लिवद्येस मिळालेले प्रोत्साहन:**

१८ व्या शतकात पेशवाई काळात मल्लविद्येचा प्रसार झपाट्याने झाला. पेशव्यांनी पुणे, सातारा, कोल्हापूर येथे राजकीय आश्रय देऊन आखाड्यांना चालना दिली. या काळातील मल्लांच्या स्पर्धा राजदरबारांमध्ये आयोजित केल्या जात, आणि विजेत्यांना सोनेरी कंकणे, जमीन, किंवा मानधन देऊन गौरविण्यात येत असे. नानासाहेब पेशव्यांनी मल्लांच्या स्पर्धांना सोन्याचे बक्षीस देऊन प्रोत्साहन दिल्याचे पुरावे मिळतात.

कोल्हापूर संस्थानामध्ये छत्रपती शाहू महाराजांच्या पूर्वजांनी म्हणजेच छ. राजाराम महाराजांनी, व छ. शहाजी महाराजांनी आखाड्यांना जमिनी आणि निधी दिला. त्यांनी खासबाग मैदान सारख्या प्रशिक्षण केंद्रांना चालना दिली. सातारा संस्थानामध्ये मल्लांना राजदरबारी मानधन मिळे. त्यांना युद्धकाळात सैन्यात सामील केले जाई.

**राजर्षी छ. शाहू महाराजांचे मल्ल विद्येतील योगदान:**

स्वातंत्र्यपूर्व काळात म्हणजेच २० व्या शतकाच्या पूर्वार्धामध्ये विशेषतः पश्चिम महाराष्ट्रातील मल्लविद्येच्या विकासामध्ये राजर्षी छत्रपती शाहू महाराज व छत्रपती राजाराम महाराजांनी मोठे योगदान दिले आहे. त्यांनी कुस्तीच्या स्पर्धा भरवून अनेक पुरस्कार बहाल केले. तसेच कुस्तीसाठी व्यक्तिगत, संस्थान पातळीवर, सामाजिक व सरकारी पातळीवरील प्रयत्न करून कुस्तीच्या विकासासाठी महत्वपूर्ण भूमिका बजावली.

**छ. शाहू महाराजांचा बलोपासनेमागील हेतू:**

राजर्षी शाहू छत्रपती हे पहिलवानांचे केवळ आश्रयदाते नव्हते, तर ते स्वतः पट्टीचे मल्ल होते आणि कुशल कर्तव्यनिष्ठुर वस्तादही होते. राजर्षी भल्या पहाटे उठत, तालमीत जात. पहिलवानांना उठविण्यसाठी एका वस्तादाची नेमणूक त्यांनी केलेली होती. तो निष्ठावंत वस्ताद पठाणाप्रमाणे मल्लांच्या खनपटीस बसे व मल्लांना उठवी. छत्रपती आले की ते मल्लांची मेहनत स्वतःच्या देखदेखीखाली करुन घेत. हौद्यात उतरत व एकेका पहिलवानाला लढत देऊन नवनवीन डावपेच शिकवीत.

छ. शाहू महाराज हे एक संस्थानिक व राजे होते. त्यावेळी एका राजाने कुस्ती आणि कसरत या फंदात पडू नये, असे म्हंटले जायचे. अशाच एका प्रसंगी महाराजांचे मेहुणे खानविलकर महाराजांना म्हणाले, गरिबांनी कुस्ती, सर्कस करावी, महाराजांनी या फंदात पडु नये. तुम्ही छत्रपती! घराण्याला काळिमा आणणारे असले हे डोंबारी खेळ करु नयेत! महाराजांनी अशा प्रकारचे बोलणे वारंवार ऐकले होते. शेवटी त्यांनी न राहून सुनावले, राजाची जागा म्हणजे सुळावरची, त्यात मी पडलो छत्रपती! छत्रपतीला शत्रू फार. स्वकीय तसेच परकिय. ते केव्हा काय करतील याचा नेम नाही. आमचे दत्तक पिताजी शिवाजी महाराज यांच्या आजारपणाचा फायदा घेऊन त्यांना वेडा ठरवून सार्जंट ग्रीन सारख्या नरपशूने दाबून, कुचलून, गुद्दे लगावून त्यांस ठार केल. तेव्हा कोणत्या राज्यकर्त्यावर केव्हा कसा प्रसंग येईल याचा काय नेम? म्हणूनच मी तालीम करतो, पैलवानांबरोबर लढत देतो. कारण, एका ग्रीन सारखे चार दोन नरपशू जरी माझ्या अंगावर आले तरी त्यांचा चुरा करण्याचे सामर्थ्य माझ्या अंगी यावे. मैदानी व मर्दानी खेळांची आवड मी प्रजेमध्ये सुरु करत आहे. कोणी सांगावे आपल्यावर परचक्र केव्हा येईल ते! या उत्तरावर मामासाहेब काय बोलणार? यावेळी महाराज म्हणाले की, “शरीर संपत्ती हे पुरुषार्थाचे साधन आहे. पैसा मिळेल, लौकिक मिळेल, पण शरीर गमावले तर ते पुन्हा मिळत नाही.” या चपखळ उत्तरानंतर मामासाहेबानी कधी टीका केली नाही.

तसे तर शाहूंच्या मुख्यत्यारीच्या खूप आधीपासून कोल्हापूरमधील वातावरण कुस्त्यांच्या दंगलींसाठी नावाजलेलेच होते. शाहूंचे जनकपिते आबासाहेब यांना कुस्त्यांचा शौक होता. ते स्वतः उत्तम तालीमबाज होते. शाहूंनाही बालपणापासूनच मल्लविद्येची गोडी होती. ते एक निष्ठावंत बलोपासक होते. मुळातच उंचीपुरी, धष्ठपुष्ट व सुदृढ शरीरयष्ठी, उत्तम प्रकृती, नियमित व्यायाम, निर्व्यसनीपणा आणि तालमींतील सतत वावर या कारणांनी शाहू महाराजांचा स्वाभाविक कल मल्लविद्येकडे होता. संपूर्ण शिक्षणकाळात त्यांनी या विद्येच्या व्यासंगामध्ये मुळीच खंड पडू दिला नाही. ते जिथे जिथे शिक्षणार्थ गेले तिथे त्यांनी कुस्तीच्या आपल्या प्रशिक्षकांना सोबत नेले होते आणि त्यांच्या देखरेखीखाली ते नियमित सराव करत असत. व्यायामाची आवड व स्वतः कुस्त्या गाजवल्या. मुलाचे पाय पाळण्यात दिसतात. त्याप्रमाणे महाराज कागलला आपल्या जनक घराण्यात असताना तेथे तालमीत व्यायाम व कुस्त्या करीत. पुढे ते अनेक वर्षे कुस्ती खेळत राहिले.

**छत्रपती शाहूकालीन मल्लपरंपरा :**

भारतात कुस्तीला अधिक महत्त्व असून या बलोपासनेपासून शरीर कमावलेली पोर स्वातंत्र्याच्या लढ्यात उमेदिने उतरतात म्हणून इंग्रजांची या मल्लविद्येवर वक्रदृष्टी होती. पण त्याची पर्वा न करता शाहू महाराजांनी कुस्तीच्या प्रोत्साहनासाठी मल्लांना मदत करण्याचे धोरण राबविले. गुलामबक्ष, हसनबक्ष, श्रीपती चव्हाण, गुलाम कादर, गोपाळ परिट, लब्बू वजीर, बापू सज्जन, पांड पैलवान, गणपत शिंदे, धोंडी पैलवान, गुणासिंग, रजब कादर, इस्माण असे अनेक नामांकित मल्ल त्यांच्या पदरी आश्रीत होते. त्यांच्या खूराकाच, निवासाचा खर्च महाराज आपल्या खाजगीतून करित असत. पैलवानांच्या आश्रयाबरोबर अनेक ठिकाणी तालीम उभारण्यावरही त्यांनी विषेश भर दिला होता. १८५५ साली प्रथमतः राज्याभिषेकानंतर आपल्या राजवाड्याशेजारील मोकळ्या जागेत तालीम उभारुन त्या तालमीस मोतीबाग तालीम असे नाव दिले ही तालीम सध्या कोल्हापूर जिल्हा राष्ट्रीय तालीम संघाच्या पूर्णपणे अखत्यारित असणारी तालीम होय.

प्रत्येक पेठेत तालीम स्थापन केल्या. जुन्या तालमींना अनुदान देऊन त्या पुन्हा जोमाने सुरु केल्या. गुणवंल मल्लांना आर्थिक मदत देण्यास सुरुवात केली. दरवर्शी तीस हजार इतकी रक्कम मल्लांच्या व्यवस्थेवर खर्च करित होते.

'पहिली शरीर संपत्ती, दुसरी पुत्र संपत्ती आणि तिसरी धनसंपत्ती असेल तोच पुण्यवान' ही राजर्षीची शिकवण आजही मोतिबाग तालमीच्या दर्शनी दरवाजावर दिसते. वरिल उक्तीनुसार शाहू महाराजांनी संपूर्ण हयत प्रजेचे कल्याण व मल्लविद्येची जोपासना केली. त्यांच्या या प्रयत्नामुळेच कोल्हापूरला मल्लविद्येचे माहेर म्हणून महत्त्व प्राप्त झालेले आहे. तालीम, शाळा, वाचनालय, हे तीन उपक्रम म्हणजे शरिर, मन आणि संस्कृतीच्या अभिसरणीची चालती बोलती शिक्षण केंद्रेच होय. म्हणून शाहू महाराजांनी ठिकठिकाणी तालीम स्थापन केल्या. राजवाड्यातील लाल आखाडा, बापूसाहेब महाराजांचा आखाडा, काळा इमाम, गंगावेश, घोडणपीर, बावडेकर, बजापतराव माने, दिलबहार, मोतिबाग, नाथा गोळे, गजी, महादू गवंडी, पंचगंगा, उत्तरेश्वर, धोत्री, बोडके, शिपुगडे, रंकाळा महाकाली तटाकडील, जूना बुधवार मठ, बाबू जमा, मंगळवार पेठ इ. अनेक तालीम व या तालमीतून अनेक मल्ल नावारुपाला आले.

छ.शाहूंच्या आश्रीत असलेल्या तालमी व तालमीतील आश्रित प्रमुख मल्ल पुढिलप्रमाणे:

| अ.क्र. | आखाड्याचे नाव | मल्लांचे नाव |
|---|---|---|
| १. | बापूसाहेब महाराज आखाडा | गुलामबक्ष, हसनबक्ष, श्रीपती चव्हाण |
| २. | बाबू जमाल आखाडा | गुलाम कादर, बिंदु ब्राह्मण, कसबेकर बंधू |
| ३. | मोतीबाग आखाडा | कल्लू गामा, बाबू बिरे, म्हादू हांडे |
| ४. | घुडणपीर आखाडा | लप्पू वजीर, बापू सज्जन, पांडू पैलवान |
| ५. | सोनतळी आखाडा | गणपत पैलवान धोंडी पैलवान, गुत्तासिंग पैलवान, रजब पैलवान, कादर इस्माईल |

रुस्तम-ए-हिंदच्या तोडीचे मल्ल तयार करण्यासाठी छ. शाहू महाराजांनी दहा कलमी कार्यक्रम हाती घेतला होता. त्यातील तरतूदी पुढिलप्रमाणे:

१. स्वत: पठ्ठे तयार करणे.
२. वस्तादा करवी पठ्ठे तयार करणे.
३. मल्लांच्या खुराकाची तरतूद करणे.
४. मल्लांच्या व्यायामावर देखरेख ठेवणे.
५. मल्लांची डॉक्टरी तपासणीची सोय करणे.
६. राजे-रजवाडे, जहागीरदार, सरदार, श्रीमंत व्यापारी व जनता यांचा मल्लविद्येला आश्रय मिळविणे.
७. सराव वाढावा म्हणून उत्तरेकडील ख्यातनाम मल्लांना पाचारण करुन त्यांची लढत इकडील मल्लांशी घडवून आणणे.
८. मल्लांना भारी पारितोषिके देणे त्यांचा मानसन्मान करणे.
९. वस्तादांच्या उदरनिर्वाहाची सोय करणे.
१०. मल्लांच्या उदरनिर्वाहाची सोय करणे.

वरील दहा कलमी योजना महाराजांनी आपल्या मनाशी ठरविली आणि मोठ्या जिद्दीने, उमेदिने कार्यास प्रारंभ केला. एव्हाना संपूर्ण हयातभर त्यासाठी त्यांनी विशेष परिश्रम

घेतले. म्हणूनच कोल्हापूर नगरीस मल्लविद्येची पंढरी हा मान मिळू शकला.

राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या संस्थानात लावलेले इवलेसे रोप त्यांच्या कारकिर्दित बहारास आले. महाराजांनी कोल्हापूरात कुस्तीचा पाया इतका भक्कम घातला की पुढिल अनेक वर्षे मल्ल परंपरा कायम टिकून राहिली. त्यांच्या अथक प्रयत्नामुळे कुस्तीच्या क्षेत्रात कोल्हापुरचे नाव भारतात व भारताबाहेर ही प्रसिद्धीस आले. तसेच 'कुस्ती म्हटलं की शाहू महाराज आणि शाहू महाराज म्हटले की कुस्ती' असे समिकरण निर्माण झाले.

शाहू महाराजांनी आपल्या कारकिर्दीत मल्लांच्या गुणांचे भरभरुन कौतुक केले. अनेक मल्ल श्रेष्ठींना त्यांनी चांदीच्या गदा, सोन्याचे तोडे व मेडल्स बहाल केले. काहिंची हत्तीवरुन मिरवणूक काढली. काहींना दरबारी सेवेत घेतले. काहींना घरे-दारे व शेतमळे इनाम दिले. "छ. शाहू महाराजांनी काहींना पेन्शन सुरु केली. त्यासाठी खास फंडाची निर्मिती केली; या फंडातून मल्लांना वृद्धापकाळात औषोधोपचार व अर्थिक सहाय्य देण्याची तरतूद केली.

**हजारी फंडाची निर्मिती:**

या शिवाय पैलवानांसाठी त्यांनी एका फंडाची तरतूद करुन ठेवली त्या फंडास 'हजारी फंड' म्हणत. त्यासाठी तिकिटे लावून कुस्त्या ठेवण्याची प्रथा महाराजांनी सुरु केली. याची सुरुवात खासबाग मैदानाच्या उद्घाटन प्रसंगी झालेल्या कुस्त्यांनी करण्यात आली. मैदानाचा खर्च वजा जाऊन जी रक्कम शिल्लक राही ती या फंडास जमा करायची अशी योजना होती. या फंडातून पैलवानांच्या उत्तर आयुष्यात, त्यांच्या म्हातारपणात औषधोपचार व इतर आर्थिक मदत यांची तरतूद करण्याचे ठरले. त्याप्रमाणे पैलवानांना मदत मिळू लागली. महाराजांनी सुरु केलेली 'हजारी फंड योजना' ही निःसंशय स्पृहणीय होती.

इंग्रजांचा विरोध असताना मल्लविद्येला, मल्लांना व तालमींना राजर्षी शाहू महाराजांनी प्रोत्साहन दिले. केवळ प्रजाजनांचा विचार न करता भारताचा त्यांनी विचार केला. अनेक बुरुजबंद मल्लांना आणवून प्रजेला लढती दाखविल्या आणि कोल्हापूरचे नाव या क्षेत्रात अजरामर केले.

**कुस्तीक्षेत्रातील वाममार्गाला विरोध:**

नुरा कुस्ती विषयी तर महाराजांना मनस्वी चीड होती. कल्लू हा एक महाराजांचा आवडता मल्ल होता. या मल्लाला महाराजांनी खुराक दिला होता. एवढेच नव्हे तर स्वतः त्याला नवनवीन डावपेच शिकवले होते. अशा या मल्लाची कुस्ती किकरसिंग नावाच्या विख्यात मल्लाशी आयोजित केली होती. ही कुस्ती पाहण्यासाठी अफाट जनसागर तिकिटे लावून आला होता. कल्लू ही कुस्ती जिंकणार हा महाराजांचा ठाम विश्वास होता. त्यासाठी चांदीची भली मोठी गदा करवून घेतली होती. ही गदा एका टेबलावर दर्शनी मांडून ठेवली होती. मैदानात प्रवेश करणारे प्रेषक गदा पाहून मोहित होत होते. कुस्ती मैदान सुरु झाले. सुरुवातीला लहान-मोठ्या कुस्त्या झाल्या. अखेर कल्लू आणि किंकरसिंग यांची मानाची कुस्ती महाराजांच्या हस्ते सुरु करण्यात आली. ही झुंज प्रेक्षणिय होणार अशी महाराजांसह सर्वांचीच खात्री होती. पण प्रत्यक्षात तसे मुळीच झाले नाही. ही कुस्ती नुरा म्हणजेच संगनमताने झाली. कुस्ती सारख्या पवित्र खेळात या उभय पैलवानांना भ्रष्टाचार करुन हा खेळ अपवित्र केल्यामुळे महाराजांना क्रोध आला; कल्लुला तर गदा दिलीच नाही पण महाराज रागाने मैदानातून निघून गेले आणि जाताना कल्लुला खडसावून गेले.

**निष्कर्ष:**

पश्चिम महाराष्ट्रातील कुस्ती परंपरेला विचार करता प्रामुख्याने आणि प्रकर्शाने राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचे नाव समोर येते. भारतीय मल्लविद्येच्या इतिहासात सन १८९४ ते १९२२ पर्यंतचा म्हणजे जवळ जवळ अठ्ठावीस वर्षांचा काळ हा मल्लविद्येच्या वैभवाचा काळ होय. हा कालखंड 'राजर्षी शाहू छत्रपती कालखंड' म्हणूनच गणला जातो. या प्रदीर्घ कालखंडात कोल्हापूर हे 'मल्लविद्येचे माहेरघर' बनले.

राजर्षीच्या कारकिर्दीत मल्लविद्येने जनमनाची पकड इतकी घेतली की गावोगावी, गल्लोगल्ली आणि आळी-आळीतून तालमी निर्माण झाल्या. सर्व जातिधर्मांच्या मल्लांना राजर्षींनी उदार आश्रय दिला होता. श्रेष्ठ दर्जाचे शेकडो मल्ल राजर्षीच्या आश्रयाला होते. त्यांनी या संदर्भात उत्तर-दक्षिण असा कधी भेदभाव केला नाही. त्यांच्या पदरी काका पंजाबी, गामा बालीवाला, चंदन, कमरुद्दीन, मोहिद्दीन, पन्ना, तिक्का या सारखे कितीतरी हिंदू-मुस्लीम बुरुजबंद उत्तर हिंदुस्थानी मल्ल तसेच गणपत शिंदे, नारायण कसबेकर, शिवाप्पा बेरड, व्यंकप्पा बुरुड, देवाप्पा धनगर, पांडू शिराळकर इत्यादी काटेजोड दक्षिण हिंदुस्थानी मल्ल होते. या मल्लांनी कुस्तीची

थोर परंपरा निर्माण केली आणि करवीर ही नामवंत कुस्तीगिरांची नगरी असा कोल्हापूरचा लौकिक वाढविला.

शाहू महाराजांनी मल्लविद्येस प्रोत्साहन देत असता मल्लांची जातपात, पंथधर्म काही पाहिले नाही. त्यांच्या उत्तेजनामुळे महार-भंगी समाजापासून बेरड-बुरुड समाजापासून अनेक मागासलेल्या जातींपासून मल्ल निर्माण झाले. माकडवाल्यांसारख्या भटक्या समाजातूनही महाराजांनी मल्ल तयार केले. स्पृश्यास्पृश्य भावनेने उत्तरेतिल मल्लांनी अस्पृश्य मानल्या गेलेल्या समाजातील मल्लांच्या बरोबर लढतीस नकार देउ नये म्हणून महार मल्लांना 'जाठ पैलवान' तर भंगी पैलवानांना 'पंडित पैलवान' अशी नावे दिली. परिणामी या मागसलेल्या जातींची अस्मिता फुलू लागली. सामाजिक दृष्ट्या महाराजांचे हे कार्य दूरगामी परिणाम करणारे होते. थोडक्यात, राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी कुस्ती क्षेत्रातील दिलेल्या योगदानामुळे पश्चिम महाराष्ट्रामध्ये कुस्तीला नवसंजीवनी प्राप्त झाली.

**संदर्भ साधने:**


१. पाटील ए. बी. (२००१), आखाडे आणि मल्लविद्या : एक सामाजिक अभ्यास, सातारा ग्रंथ प्रकाशन, सातारा.

२. जोशी एम. एन. (२००१), आखाडे आणि मल्लविद्या: एक सामाजिक अभ्यास, सातारा ग्रंथ प्रकाशन, सातारा.

३. शिंदे टी.आर. (१९९७), महाराष्ट्रातील क्रीडा परंपरा, क्रीडा संशोधन संस्था प्रकाशन, पुणे.

४. पवार जयसिंगराव आप्पासाहेब (संपा.) (२००१), राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर.

५. मंगल के. टी.(२००६), समाजशास्त्रज्ञ राजर्षी शाहू, आवृत्ती १, ममता प्रकाशन, कोल्हापूर.

६. जाधव रमेश (१९९७), लोकराजा शाहू छत्रपती, सुरेश एजन्सी, पुणे.

७. सुर्यवंशी उमेश (२०१८), राजर्षी, लोकराजा फोरम, कोल्हापूर.

८. शिर्के वसंत (कार्य.संपा), कणबरकर रा.कृ. (संपा), (१९९३), राजर्षी शाहू महोत्सव, राजर्षी शाहू छत्रपती मेमोरियल ट्रस्ट, कोल्हापूर.

९. पाटील शामराव (संक.), धाटावकर भास्कर (संपा.) (१९८८), राजर्षी शाहू छत्रपतींचे निवडक आदेश, पुराभिलेख विभाग महाराष्ट्र शासन, मुंबई.

१०. साळुंखे नानासाहेब (२००६), शाहूंच्या आठवणी, वृशाली प्रकाशन, कोल्हापूर.

११. पाटील एस. जी. (१९९०), कोल्हापूर दरबाराचा इतिहास, श्री प्रकाशन,कोल्हापूर.

१२. जोशी आर. के. (२००५),कोल्हापूरची मल्लविद्या, विदर्भ प्रकाशन, सांगली.

१३. सहस्त्रबुद्धे चितांमणी, सांगलीच्या पाऊलखूणा, सकाळ पेपर्स लिमिटेड,कोल्हापूर.